**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे     सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.

- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स

संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १७९ । शुक्रवार ३ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322

# उपमुख्यमंत्री शिंदेंनी खरातला १७ फोन केले

## अंजली दमानियांच्या पुराव्याने आरोप-प्रत्यारोप

**मुंबई । वृत्तसंस्था** - रुपाली चाकणकर आणि अशोक खरात यांच्यात १७७ वेळा तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही अशोक खरातला १७ फोन केल्याचे पुराव्यांमध्ये दिसत आहे. हे कॉल नेमके कशासाठी केले? असा थेट प्रश्न सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. त्यामळे राजकीय क्षेत्रात पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोप होऊ लागले आहेत.

दमानिया यांच्या आरोपावर मंत्री उदय यामंत यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की, दिली उदय सामंतांनी फोन केलाय का? आता ज्यांचं फोनवर बोलणं झालंय, त्यांनी अशोक खरातच्या कृत्याचं समर्थन केलेलं नाही. आता त्याने या नेत्यांशी बोलणं झाल्यावर त्याचा गैरफायदा घेऊन हे कृत्य केलं आहे. मात्र ही वृत्ती संपुष्टात आणण्याची भूमिका शिवसेनेची आहे असे सामंत म्हणाले. आमच्या बाजूला येऊन काही लोक फोटो घेतात. मग त्याने काही चुकीचं कृत्य केलं तर त्यात आम्ही सामील आहोत का? असा सवाल सामंत यांनी केला.

### शिंदेंवर घाणेरडे आरोप करणे हे बेशरमपणाचे लक्षण - गायकवाड

शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की, एकनाथ शिंदेंवर घाणेरडे आरोप करणे हे बेशरमाचं लक्षण आहे. या ज्या काही दोन-तीन बाया टिवटिव करतात, त्यांनी विनाकारण घाणेरडं राजकारण करु नये असे गायकवाड म्हणाले. त्या भोंदू बाबाने जे काही केले असेल ते बाहेर काढलं पाहिजे असे गायकवाड म्हणाले. दमानियांच्या आअशोक खरात याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी अनेक कॉल रेकॉर्ड असल्याचे आरोप अंजली दमानिया यांनी केले आहेत. यावर बोलताना आमदार संजय गायकवाड भडकले. ते म्हणाले की आपला देश हा हिंदू धर्मियांचा देश आहे व देवी-देवतांना मानणारा देश आहे. माजी मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भोंदू घराच्या पोटात काय आहे हे थोडंच माहिती होतं. त्यामुळं कोणी कोणासोबत फोटो काढला किंवा कुणाला कॉल केला त्याचा अर्थ असा होत नाही. त्यामुळं एकनाथ शिंदे यांच्यावर आरोप करणे हे बेशरमाचे लक्षण आहे व या ज्या काही दोन-तीन बाया (महिला ) टिव टिव करतात. त्यांनी ते बंद केले पाहिजे विनाकारण त्यांनी राजकारण करू नये असे गायकवाड म्हणाले.

# सामाजिक कार्यकर्तीचे खासगी फोटो व्हायरल करून बदनामी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर** - सामाजिक कार्यकर्तीचे खासगी फोटो व्हायरल करून बदनामी केल्या प्रकरणी जय ओबीसी' या फेसबुक पेजसह हर्षवर्धन बारवकर या खातेधारकाविरुद्ध सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत ३५ वर्षीय पीडित महिलेने फिर्याद दिली आहे. फिर्यादी सामाजिक कार्यकर्ती असून, एका सामाजिक संघटनेत कार्यरत आहे. महिला व तिच्या ओळखीचे दत्तात्रय खेमनर यांनी परस्पर संमतीने काही खासगी सेल्फी काढले होते. मात्र, हे फोटो त्यांच्या परवानगीशिवाय 'जय ओबीसी' या फेसबुक पेजवर तसेच हर्षवर्धन बारवकर याच्या खात्यावरून प्रसारीत करण्यात आले.

दिनांक २७ मार्च रोजी सकाळी११ वाजेच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आल्यानंतर संबंधित महिलेने २ एप्रिल रोजी नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. अनधिकृतपणे फोटो प्रसारीत करून जाणीवपूर्वक बदनामी करण्याच्या उद्देशानेच हे कृत्य करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी 'जय ओबीसी' नावाचे फेसबुक पेज व हर्षवर्धन बारवकर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७७ तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ (ई) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सायबर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सागर ढिकले करीत आहेत.

# समतानगर ते नानाजी नगरपर्यंत चोरट्यांचा धुमाकूळ

## सीसीटीव्हीत कैद, तात्काळ अटकेची मागणी । अभिनव कॉलनी, बकली, फुलसौंदर मळा, ओम कॉलनी, महादेव मंदिर परिसरही टार्गेट

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर** - शहरातील बुरुडगाव रोड परिसरातील सारसनगर भागात घरफोड्यांची मालिका सुरू असून चोरट्यांनी विविध भागात डल्ला मारत नागरिकांची झोप उडवली आहे. समता नगर, अभिनव कॉलनी, , फुलसौंदर मळा, ओम कॉलनी, नानाजी नगर तसेच महादेव मंदिर परिसरात चोरीच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या भागांमध्ये मिळून आठ ते दहा घरफोड्या झाल्याची माहिती समोर आली असून चोरटे रात्रीच्या वेळी घरांना लक्ष्य करत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, हे चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाले असूनही अद्याप त्यांना अटक करण्यात आलेली नाही, यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी नगरसेवक संजय चोपडा यांनी कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्याकडे निवेदन देत चोरट्यांना तात्काळ अटक करून कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सातत्याने होत असलेल्या घरफोड्यांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून पोलिसांनी तातडीने तपास गतीमान करून आरोपींना अटक करावी. तसेच संबंधित परिसरात पोलीस गस्त वाढवून नागरिकांमध्ये

■ पान ४ वर

# गोवंशाची कत्तल करणाऱ्या टोळीवर बीएनएस १११ चे कलम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर** - संघटितपणे गोवंशीय जनावरांची कत्तल करुन गोमांस विक्री करणा-या सराईत टोळीवर भारतीय न्याय संहिता कलम १११ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. असिफ ईकबाल कुरेशी व तन्वीर मोहम्मद कुरेशी (दोघे रा. सदर बाजार, भिंगार) अशी कारवाई झालेल्यांची नावे आहेत.

दि.२० मार्च रोजी कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २७१, ३२५, १११, ३(५) सह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ (अ), ५(ब), ५ (क), ९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्ह्यात या दोघांना अटक करण्यात आली आहे.

असिफ इकबाल कुरेशी ■ पान ४ वर

# युद्धामुळे शेअर बाजाराबरोबरच सोने-चांदीच्या दरात पडझड

**मुंबई । वृत्तसंस्था** - इराण-अमेरिका आणि इस्रायल यांच्या सुरू असलेल्या युद्धामुळे संपूर्ण जग युद्धाच्या सावटाखाली आहे. यामुळे शेअर बाजाराला उतरती कळा लागली आहे, तर दुसरीकडे सोन्या-चांदीच्या किमतींमध्ये मोठी पडझड दिसून येत आहे. मागील तीन-चार दिवसांपासून सातत्याने सोन्या- चांदीच्या किमती पडताना दिसत आहेत. आज शुक्रवारी २४ कॅरेट सोन्याची किंमत ३०२० रुपयांनी घसरलीय. आज १० ग्रॅम सोन्यामागे ग्राहकांना एक लाख ४९ हजार ४७० रुपये द्यावे लागतील. तर, काल चांदीचा दर २ लाख ४३ हजार ५०० एक रुपयांवर स्थिरावला होता. आज किलोमागे चांदी २ लाख ३२ हजार ९०० रुपयांवर पोहोचली आहे. आज चांदीचा दर जवळपास १० हजार रुपयांनी उतरला आहे.

गेल्या महिन्याभरापासून सोने चांदीच्या दारात प्रचंड चढ-उतार सुरू आहेत . परिणामी ग्राहकांना सोनं खरेदी करावं की नाही हा संभ्रम कायम आहे. जागतिक बाजारपेठेतील अनिश्चितता, मध्यपूर्व भागातील तणाव, युद्धासंबंधी होणारे निर्णय, घोषणा या सगळ्याच्या परिणामामुळे

■ पान ४ वर

राहुरी विधनासभा मतदार संघाची निवडणूक

# अक्षय कर्डिले सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार

## प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण उपस्थित राहणार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर** -स्व.शिवाजीराव कर्डीले यांच्या आठवणींना उजाळा देणारी आहे.जनता महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभी असली तरी प्रत्येक कार्यकर्त्याने सकारात्मक दृष्टीकोन ठेवून मतदारापर्यत पोहचविण्याची जबाबदारी घेण्याचे आवाहन जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. सोमवारी ६एप्रिल रोजी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राहुरी विधनासभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील प्रमुख



पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.आ.मोनिका राजळे जेष्ठ नेते सुभाष पाटील भाजपाचे जिल्हाध्यक्ष ■ पान ४ वर

# मुंबईतील सर्व शाळांमध्ये मनाचे श्लोक सक्तीचे करा

## उबाठा गटाच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांची मागणी

**मुंबई । वृत्तसंस्था** - मुंबईतील सर्व शाळांमध्ये मनाचे श्लोकचे शिक्षण देणे सक्तीचे करावे, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या तथा मुंबई महापालिकेच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी केली आहे. पेडणेकर यांच्याकडून महापालिकेच्या सर्वसाधारण सभेतही याबाबत मागणी केली जाणार आहे.

किशोरी पेडणेकर यांनी याबाबत माध्यमांशी बोलताना सांगितले की, महापालिकेच्या मुंबईत जेवढ्या शाळा आहेत, मग ते खासगीत असतील, अनुदानित असतील, सगळ्यांनी हा अभ्यासक्रम घ्यावा. सर्व शाळांमध्ये सर्वधर्मीय मुलं शिकतात. आपल्याला छोट्या मुलांवर चांगले संस्कार, देशासाठी प्रेम करणारी मुलं, आणि चांगलं वर्तन करा हे सांगण्यासाठी आम्ही हे करतोय. सर्व शाळांमध्ये आमच्या महाराष्ट्रात मराठी भाषा सक्तीची आहे. तर आमच्या मुंबईतील सर्व शाळांमध्ये मनाच्या श्लोकाचा १५ ते २० मिनिटांचा एक पिरियड घ्यावा. त्याने उच्चार चांगले होतात. स्मरणशक्ती वाढते. हे साधे प्रयोग आहेत ते आपल्या मुलांवर करावे आणि देशाचा चांगला आदर्श नागरीक घडवला पाहिजे, असे मत किशोरी पेडणेकर यांनी व्यक्त केले.

# गारपिटीसह अवकाळी पावसाने नुकसानीची आ. दातेंनी केली पाहणी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर** - पारनेर तालुक्यात सध्या पडत असलेल्या गारपिटीसह अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. हंगामाच्या निर्णायक टप्प्यावर आलेल्या पिकांवर या अनियमित पावसाचा जबरदस्त परिणाम झाला असून अनेक ठिकाणी गारपीट व जोरदार वाऱ्यामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे.

कांदा, गहू, टोमॅटो, डाळिंब, कलिंगड यांसारखी पिके काढणीच्या अवस्थेत असताना गारांसह पडलेल्या पावसामुळे शेतातच पडून राहिली आहेत. कांद्याच्या पिकाला विशेष फटका बसला असून पाण्यामुळे सड, अंकुर फुटणे व दर्जा खालावणे अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. गव्हाचे पीक ओलाव्यामुळे आडवे पडून धान्याची गुणवत्ता कमी झाली आहे, तर फळबागांमध्ये डाळिंब व आंब्याच्या फुलांवर व फळांवर परिणाम होऊन उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे.

> शेतकरी अडचणीत असताना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, ही माझी जबाबदारी असून मला ह्या जबाबदारीची जाणीव आहेच परंतू या संकटकाळात प्रशासन पूर्णतः सतर्क असल्याचे पाहून आपण सर्वजण सामूहिक प्रयत्नांतून ह्या संकटावर निश्चितपणे मात करू असा मला विश्वास आहे.
>
> - आमदार काशिनाथ दाते सर
> (विधानसभा सदस्य)

पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी पारनेर तालुक्यातील पाडळी आळे, अळकुटी, रेणवडी, म्हस्केवाडी आदी गावांमध्ये जाऊन या नैसर्गिक आपत्तीमुळे ओढवलेल्या नुकसानीची अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांनी नुकसानग्रस्त भागांची पाहणी केली व अधिकाऱ्यांना तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी आमदार दाते सर म्हणाले की, ''शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने व खर्च करून उभे केलेले पीक गारपीटीसह झालेल्या पावसामुळे उद्ध्वस्त झाले आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत द्यावी. शेतकऱ्यांना या

■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक

### आनंदऋषीजी नेत्रालय तारकपूर शाखेत मोफत नेत्र तपासणी शिबिर



अहिल्यानगर- जैन सोशल फेडरेशनचे सक्रिय सदस्य स्व. कुंदन कांकरिया यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेत शनिवार दि. ४ एप्रिल २०२६ रोजी मोफत नेत्र तपासणी व उपचार मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १०.३० ते ६.३० यावेळेत नेत्र रोग तज्ज्ञ डॉक्टर या शिबिरात रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती नेत्रालयाचे प्रशासनाधिकारी आनंद छाजेड यांनी दिली. जैन सोशल फेडरेशनच्या कार्यात हिरीरीने सहभाग नोंदवणाऱ्या स्व. कुंदन कांकरिया यांनी स्थापनेपासून नेत्रालयाच्या विस्तारात अमूल्य योगदान दिले. अंधत्व निर्मूलनासाठी ते सतत कार्यरत होते. आनंदऋषीजी नेत्रालयात उच्च दर्जाच्या उपचार सुविधा मिळण्यासाठी ते कायम प्रयत्नशील राहिले. नेत्रालयात रूग्णांसाठी बैठक व्यवस्था, शेड, भोजन व्यवस्था उभारणीत योगदान दिले. त्यांनी देशातील सुप्रसिद्ध अरविंद आय हॉस्पिटल येथे जाऊन. १० दिवस निवासी प्रशिक्षण व मास्टर प्लॅन निर्मितीचा सखोल अभ्यास केला. त्याद्वारे आनंदऋषीजी नेत्रालय येथे आवश्यक सेवा विस्तार केला. आनंदऋषीजी नेत्रालय येथील उच्च दर्जाच्या सेवेचा लाभ जास्तीत जास्त रूग्णांना मिळावा यासाठी त्यांनी सावेडी उपनगरांत तारकपूर येथे अद्ययावत शाखा सुरू करण्यात महत्वपूर्ण योगदान दिले. आनंदऋषीजी नेत्रालयाने अल्प दरात सर्वसामान्य नेत्र रूग्णांना निर्दोष दृष्टी देण्यासाठी सातत्याने प्रयत्न चालवले आहेत. नगरसह मराठवाड्यातील जिल्ह्यात नेत्रालयाचे १७ व्हिजन सेंटर कार्यान्वित आहेत. या माध्यमातून ग्रामीण भागातील रूग्णांसाठी वेळोवळी नेत्र तपासणी शिबिर घेऊन पात्र रूग्णांना नगरमध्ये आणून नेत्र शस्त्रक्रिया केल्या जातात. याकामी कांकरिया यांनी मोठे योगदान दिले आहे.नेत्रालयात आजतागायत १ लाखांहून अधिक यशस्वी नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. या शिबिरातून नेत्रालय येथील उपचार सुविधांचा लाभ जास्तीत जास्त रूग्णांनी घ्यावा असे आवाहन जैन सोशल फेडरेशनच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ८६८६३०१५१५.

### शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांचे भद्रा मारुती मंदिर परिसरात स्वच्छता अभियान




अहिल्यानगर - हनुमान जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रसिद्ध देवस्थान भद्रा मारुती (खुलताबाद) येथे अहिल्यानगरच्या सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वच्छता अभियान राबविले. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा सामाजिक उपक्रम पार पडला. संस्थेच्या वतीने अहिल्यानगर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यात देखील सामाजिक कार्य सुरु आहे. हनुमान जयंतीच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात भाविकांची गर्दी होत असल्याने परिसर स्वच्छ व प्रसन्न वातावरण ठेवण्याच्या उद्देशाने या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्वयंसेवकांनी मंदिर परिसरातील कचरा संकलित करून स्वच्छतेचा संदेश दिला. या उपक्रमावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, मुख्याध्यापक भाऊसाहेब कदम, अमोल नलगे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. पै. नाना डोंगरे म्हणाले की, भगवान हनुमान हे शक्ती, सेवा आणि समर्पणाचे प्रतीक आहेत. त्यांच्या शिकवणुकीतून आपण समाजसेवेचा मार्ग स्वीकारला पाहिजे. स्वच्छता ही केवळ जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची नैतिक कर्तव्य आहे.मंदिर परिसरात येणाऱ्या प्रत्येक भाविकाला स्वच्छ, शांत आणि पवित्र वातावरण मिळावे, हीच या अभियानामागील आमची भावना आहे. आज आपण केलेली ही छोटी कृती उद्या मोठ्या बदलाचे रूप घेईल, असा आमचा विश्वास आहे. आपण सर्वांनी स्वच्छतेचा हा संदेश आपल्या गावात, शहरात आणि समाजात पोहोचवावा. 'स्वच्छ भारत, सुंदर भारत' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याचे त्यांनी आवाहन केले.

# भगवानगडाचे विद्यार्थी केशव शास्त्री यांची जय हनुमान संस्थान, राणेगावच्या महंतपदी नियुक्ती

**महंत नामदेव महाराज शास्त्री यांनी आपल्या लाडक्या शिष्याचे केले तोंड भरून कौतुक**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**भगवानगड–** राणेगाव ग्रामस्थांच्या विनंतीनुसार व ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या अध्यक्षतेखाली श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्ट संचलित ज्ञानेश्वरी विद्यापीठ, श्री क्षेत्र भगवानगड येथील विद्यार्थी ह.भ.प.श्री.केशव महाराज शास्त्री भगत यांची राणेगांव येथील जय हनुमान संस्थानच्या महंतपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे राणेगांवसह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून महाराजांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महंत केशव महाराज शास्त्री भगत हे महंत डॉ.नामदेव महाराज शास्त्री यांचे शिष्य असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी धार्मिक व सामाजिक कार्यात मोलाची भूमिका बजावली आहे.

त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर हनुमान संस्थानच्या महंतपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. भव्य जल्लोष करत राणेगावकरांनी महाराजांचे स्वागत केले. महाराजांच्या स्वागतासाठी श्री क्षेत्र भगवानगडावरून राणेगावपर्यंत मोटारसायकल रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत मोठ्या संख्येने भाविकांनी सहभाग घेतला होता. ऐश्वर्यासंपन्न संत श्री भगवानबाबांच्या नावाचा जयघोष करत जय हनुमान आणि महाराजांच्या जयघोषांनी परिसर दणाणून गेला होता.

राणेगावमध्ये आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी, पुष्पवृष्टी आणि ढोल–ताशांच्या गजरात महाराजांचे स्वागत करण्यात आले. ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत आनंद व्यक्त केला. महंत केशव महाराज शास्त्री भगत यांनी यावेळी बोलताना, माझ्यावर सोपविण्यात आलेली ही जबाबदारी मी निष्ठेने पार पाडेन. संस्थानच्या माध्यमातून धार्मिक परंपरा जपत समाजसेवा अधिक प्रभावीपणे करण्याचा प्रयत्न करेन असेही सांगितले. दरम्यान, महंत डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानाचा कारभार अधिक सक्षमपणे पुढे नेला जाईल असा विश्वासही नूतन महंत केशव महाराज शास्त्री यांनी व्यक्त केला. कार्यक्रमामध्ये बोलताना महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी सांगितले की, भगवानगडाचा प्रत्येक विद्यार्थी हा भगवान श्री ज्ञानोबारायांच्या ज्ञानरुपी मोगऱ्याला लागलेली एक एक कळी आहे. त्या प्रत्येक कळीचं श्री क्षेत्र भगवानगडावरील ज्ञानेश्वरी विद्यापीठामध्ये सुंदर असं ज्ञानरूपी फुल बनवले आहे. त्या ज्ञानरूपी फुलांचा सुगंध आज महाराष्ट्र चाखत आहे. यावेळी कार्यक्रमासाठी श्री क्षेत्र भगवानगडाचे प्रधानाचार्य, ह.भ.प.श्री. नारायण महाराज शास्त्री, महंत भगवान महाराज शास्त्री,महंत नवनाथ महाराज शास्त्री,महंत अतुल महाराज शास्त्री, महंत हनुमंत महाराज शास्त्री,महंत संतोष महाराज शास्त्री, महंत गणेश महाराज शास्त्री इत्यादींसह भगवानगडावरील सर्व साधक मंडळींची उपस्थिती होती. तसेच समस्त राणेगांव व राणेगांव परिसरातील शेकडो भाविकांची कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थिती होती.

# श्री गुरुदत्त मल्टीस्टेट पतसंस्थेला ४ कोटी ०३ लाख रुपयांचा नफा

**आर्थिक वर्षामध्ये ठेवींमध्ये ११ कोटींची वाढ – अध्यक्ष बा.ठ.झावरे**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** श्री गुरुदत्त मल्टीस्टेट पतसंस्थेला दि.३१ मार्च २०२६ अखेर ४ कोटी ०३ लाख रुपयांचा नफा झाला असून संस्थेच्या ठेवीमध्ये ११ कोटी रुपयांची वाढ झाल्याची माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन श्री.बा.ठ. झावरे यांनी दिली.लवकरच संस्था १५० कोटी रुपयांच्या ठेवीचा टप्पा पार करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


संस्थेच्या ८शाखांच्या माध्यमातून व १५ वर्षाच्या वाटचालीमध्ये सभासदांना अत्याधुनिक बँकिंग सुविधा तसेच विविध प्रकारच्या ग्राहकभिमुख योजनांच्या माध्यमातून सेवा देण्याचा प्रयत्न संस्थेने केलेला आहे. ३१ मार्च २०२६ या आर्थिक वर्षात संस्थेकडे १४३ कोटी रुपयांच्या ठेवी असून कर्ज वाटप ११९ कोटी रुपये इतके आहे.

संस्थेने विविध बँकांमध्ये ४५ कोटी रुपयांची सुरक्षित गुंतवणूक केलेली आहे. संस्थेचा एकूण व्यवसाय २६२ कोटी रुपये इतका झालेला आहे. राखीव व इतर निधी ११ कोटी ७५ लाख रुपये आहे. संस्थेला थकबाकीचे प्रमाण अत्यल्प राखण्यास यश आलेले आहे.संस्थेने १५ वर्षे सातत्याने नफा मिळवताना ऑडिट वर्ग 'अ' प्राप्त झालेला आहे.

संस्थेने नवीन व प्रगत तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे संस्थेची प्रगतीची घौडदौड चालु आहे. खातेदारांना संस्थेच्या कोणत्याही शाखेतून रक्कम काढता यावी यासाठी संस्थेने कोअर बँकिंग प्रणालीचा स्वीकार केला आहे. संचालक मंडळाने नेहमीच सभासदांचे हित जपण्याचा प्रयत्न केलेला असून सर्व ग्राहकांनी व सभासदांनी संस्थेप्रती दाखविलेल्या विश्वासास कधीही तडा जाऊ न देता सर्व संचालक मंडळ, ठेवीदार, कर्जदार, सर्वसामान्य ग्राहक,हितचिंतक व कर्मचारी वर्ग यांच्या पाठबळावर संस्था प्रगतीपथावर नेण्याचा प्रामाणिक व विश्वासास पात्र राहूनच प्रयत्न भविष्यकाळातही करणार असल्याचे संस्थापक अध्यक्ष बा.ठ.झावरे यांनी सांगितले.

# अवकाळी पावसाचा वीटभट्ट्यांना फटका; पैठण तालुक्यात लाखोंचे नुकसान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी





**पैठण–** तालुक्यातील शेकडो वीटभट्ट्यांवर अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला असून, या व्यवसायावर उपजीविका करणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार तरुणांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नोकरीच्या अभावामुळे अनेक युवकांनी वीटभट्टी व्यवसायाचा मार्ग स्वीकारला होता. मात्र, अचानक आलेल्या पावसामुळे तयार वीटा भिजून निकामी झाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

वीटभट्ट्यांवरील काम अंतिम टप्प्यात असताना अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने कच्च्या व तयार वीटा दोन्हींचे नुकसान झाले. त्यामुळे या व्यवसायावर अवलंबून असलेल्या कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले आहे. पैठणसह पाटेगाव, चनकवाडी, पारोळा, कुरण पिंपरी, वडवाळी या भागांत मोठ्या प्रमाणात वीटभट्ट्या असून सर्वत्र नुकसानाचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना मदत व भरपाई जाहीर करावी, अशी मागणी व्यावसायिकांकडून होत आहे.

# कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता बँकेचा २०२५–२६ आर्थिक वर्षामध्ये रु. ५०.२५ कोटीचा उच्चांकी नफा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी








**अहिल्यानगर–** नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेचे सभासद, ठेवीदार, कर्जदार व ग्राहकांचे बहुमुल्य सहकार्य व विश्वासामुळे आजच्या आर्थिक टंचाईच्या काळातही बँकेचा मार्च २०२६ अखेर एकूण व्यवसाय रु. ४८६९ कोटी इतका झाला. यामध्ये ठेवी रु. २९७५ कोटी व रु. १८९४ कोटींच्या कर्जाचा समावेश आहे. बँकेचे भागभांडवल रु. ८१ कोटी इतके झाले असून, आर्थिक तरतुदीपूर्वीचा नफा रु. ५०.२५ कोटी इतका झाला. बँकेचे निव्वळ एनपीएचे प्रमाण १.९१% इतके राहिले आहे. माजी खासदार व बँकेचे संस्थापक चेअरमन श्री. कल्लाप्पाण्णा आवाडे (दादा) व आमदार प्रकाश आवाडे यांनी वेळोवेळी दिलेल्या अनमोल मार्गदर्शनामुळेच बँक आज प्रेरणादायी प्रगती करत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी याप्रसंगी काढले. सन २०२५–२६ अखेरची बँकेची सांपत्तिक स्थिती खालीलप्रमाणे आहे. ३१.०३.२०२६ अखेर (रुपये कोटीत)– भाग भांडवल– ८०.९०, ठेवी– २९७५, कर्जे– १८९४, एकूण व्यवसाय– ४८६९, ढोबळ नफा– ५०.२५, ढोबळ एनपीए– १७८.६८, ढोबळ एनपीए % – ९.४५%, निव्वळ एनपीए % – १.९१%, सीआरएआर – १५%. बँकांमधील व्याजदरातील तीव्र स्पर्धा, नैसर्गिक आपत्ती, भौगोलिक राजकीय अस्थिरता या व यांसारख्या अनेक कारणाने उद्योग, व्यापार, सेवा यामध्ये मंदीसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेने गत आर्थिक वर्षामध्ये सुरुवातीलाच रेपो रेट कमी केल्यामुळे, तसेच शेअर मार्केटमध्येही सारखीच परिस्थिती असल्यामुळे, ठेवी संकलित करणे व बँकांचे ठेवींचे प्रमाण अपेक्षित राखण्यासाठी सर्वच बँकांनी कर्जावरील व्याज दर कमी केले. पण त्या प्रमाणात ठेवीचे व्याज कमी केले नाहीत. परिणामी, सर्वच बँकांच्या नफ्यावर याचा विपरित परिणाम झालेला दिसून येत आहे. सध्याच्या युद्धजन्य व मंदीसदृश्य परिस्थितीमुळे, जुन्या, तसेच नवीन ग्राहकांकडून अपेक्षित कर्जाची मागणी होत नाही. त्यामुळेही कर्जाच्या प्रमाणामध्ये वाढ होताना दिसून येत नाही.

# शहापूर येथील त्या पेट्रोल पंप चालकाची डिलरशिप रद्द करण्याची मागणी

**बिल मागितल्यावरुन ग्राहकावर लोखंडी रॉडने हल्ला; भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल**




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर–पाथर्डी रोडवरील शहापूर येथील हिंदुस्तान पेट्रोलियमच्या आनंद पेट्रोल पंपावर डिझेलचे बिल मागितल्याच्या कारणावरून ग्राहक व त्याच्या मित्रावर लोखंडी रॉडने मारहाण केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात संबंधित सेल्समन व पंप कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार विशाल राजेंद्र बेरड यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडकडे पंपावरील गैरप्रकारांची तक्रार केली असून, त्यानंतर संबंधित पेट्रोल पंप बंद करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच, या पंपाची डिलरशिप तात्काळ रद्द करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

विशाल बेरड हे पेव्हर ब्लॉक व जेसीबी मशीन व्यवसाय करतात आणि त्यांच्या मशिनसाठी ते नियमितपणे आनंद पेट्रोल पंपावरून डिझेल घेत असतात. दिनांक २९ मार्च रोजी रात्री सुमारे साडेनऊच्या सुमारास ते आपल्या मित्र गणेश जरे यांच्यासोबत मोटारसायकलवरून संबंधित पंपावर गेले होते. त्यांनी सुमारे ३,५०० रुपयांचे डिझेल प्लास्टिकच्या ड्रममध्ये भरून घेतले व त्याचे पैसेही अदा केले.

मात्र, व्यवहारानंतर त्यांनी बिलाची मागणी केली असता, तेथील सेल्समन प्रशांत बेरड याने बिल देण्यास नकार दिला. यावरून वाद निर्माण झाला आणि तक्रारदार आणि त्याच्या मित्राला मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. या घटनेप्रकरणी पोलिसांनी प्रशांत गोरख बेरड, सागर मधुकर बेरड, निलेश गोरख बेरड आणि किरण संपत नाटक (सर्व रा. शहापूर, ता. अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, तक्रारदाराने पंपावरील कर्मचारी मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत असल्याचा आरोपही केला असून त्यांचे वर्तन अत्यंत अश्लील, गैरव्यावसायिक आणि बेजबाबदार असल्याचे नमूद केले आहे. तसेच, पंप व्यवस्थापनाकडून सुरक्षा नियमांचे गंभीर उल्लंघन होत असल्याचेही तक्रारीत नमूद आहे. पंपावर सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत नसणे, मोफत हवा व पाण्याची सुविधा उपलब्ध नसणे, कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत काम करणे, तसेच देखभाल व सुरक्षा नियमांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे आरोप करण्यात आले आहेत. याशिवाय, पंप मालकाकडून कर्मचाऱ्यांचे संरक्षण केले जात असल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर आनंद पेट्रोल पंपाची डिलरशिप तात्काळ रद्द करून संबंधित मद्यधुंद कर्मचाऱ्यांवर कडक शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# भाऊसाहेब कदम यांना पंडित जवाहरलाल नेहरू गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान

**दिव्यांगांच्या शिक्षणासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** तुबा नाज हेल्प मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय व मोलाचे योगदान दिल्याबद्दल भाऊसाहेब लक्ष्मण कदम यांना पंडित जवाहरलाल नेहरू गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अल्पबचत भवन, जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या कार्यक्रमात नंदूरबारचे उपजिल्हाधिकारी मनोज देशमुख यांच्या हस्ते कदम यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी सतीश बावीस्कर, जळगाव सोसायटीचे संचालक विजय पवार, माजी मुख्याध्यापक शब्बीर शेख, एकता संघटनचे अध्यक्ष फारुक शेख, सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोफ्लगरे, हकीम चौधरी, फारुक पटेल, संस्थेचे अध्यक्ष डॉ. जावेद शेख आदी उपस्थित होते.

भाऊसाहेब लक्ष्मण कदम हे टिळक रोड येथील ज्योत्स्ना उद्योग केंद्र सोसायटीच्या कार्यशाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ते दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसनासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांनी केवळ शैक्षणिक मार्गदर्शनच केले नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना स्वावलंबी जीवनाकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरित केले आहे.

कदम यांनी अनेक दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणत त्यांना आत्मनिर्भर बनविण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत स्वतःचे स्थान निर्माण केले असून, समाजात सन्मानाने उभे राहण्याची ताकद मिळवली आहे. शिक्षणासोबतच व्यक्तिमत्त्व विकास, कौशल्य प्रशिक्षण आणि पुनर्वसन यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी देत असलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांना पंडित जवाहरलाल नेहरू गुणवंत शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### गजराज नगरला हनुमान जन्मोत्सवाची महाप्रसादाने मोठ्या उत्साहात सांगता



अहिल्यानगर- नगर - छत्रपती संभाजी नगर रोडवरील गजराज नगर येथील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या हनुमान मंदिरात जन्मोत्सव साजरा करून महाप्रसादाने मोठ्या उत्साहात भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. सालाबाद प्रमाणे यंदाही येथील युवकांनी प्रवरा संगम येथून कावडीने पाणी आणून जन्मोत्सवापूर्वी श्री हनुमान मूर्तीस जलाभिषेक केला. युवकांचे श्रद्धास्थान असलेल्या या श्री हनुमानाची उपासना करून मोठ्या भक्ती भावाने सूर्योदयाला जन्मोत्सवाचे सुमारास भक्तांनी पुष्पवृष्टी करून जन्मोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गजराज नगर येथील शिवराजे मित्र मंडळाचे कार्यकर्ते, तरुणांनी कावडीने पाणी आणून श्री हनुमान मूर्तीस जलाभिषेक केला. दरवर्षी हनुमान जयंती उत्सवाला महाप्रसादाचे आयोजन आसाम टी कंपनीचे हेमंत भाई पटेल स्वतः करत असतात त्यानिमित्त त्यांचा शिवराजे मित्र मंडळाचे वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी नागरिक उपस्थित होते. भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. महाप्रसादाने हनुमान जन्मोत्सवाचे सांगता करण्यात आली.

### नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर पालकांना महत्त्वाचे आवाहन

अहिल्यानगर - १ एप्रिल २०२६ पासून नवीन शैक्षणिक वर्षास सुरुवात होत असल्याने दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची तयारी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर अखिल स्तरीय महा ई-सेवा केंद्र व आधार केंद्र संघटना, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष श्री. आनंद कैलास दळवी यांनी सर्व पालकांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आवश्यक कागदपत्रे आधीच तयार ठेवावीत, असे त्यांनी स्पष्ट केले.



दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेताना जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, रहिवाशी प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र यांसारखी कागदपत्रे अनिवार्य असतात. अनेकदा ही कागदपत्रे वेळेवर उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत अडथळे येतात. त्यामुळे पालकांनी आजच या सर्व कागदपत्रांची पूर्तता करून ठेवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. याबाबत बोलताना श्री. आनंद दळवी म्हणाले की, ''दरवर्षी प्रवेशाच्या काळात पालकांची मोठी धावपळ होताना दिसते. कागदपत्रे अपुरी असल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होते. त्यामुळे पालकांनी वेळेआधीच सर्व आवश्यक प्रमाणपत्रे काढून ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. ही छोटीशी काळजी विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी मोठी ठरू शकते. ते पुढे म्हणाले, ''महा ई-सेवा केंद्रांमार्फत सर्व प्रकारची कागदपत्रे सुलभ पद्धतीने उपलब्ध करून दिली जातात. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठीही ही कागदपत्रे आवश्यक असतात. त्यामुळे पालकांनी शेवटच्या क्षणी गर्दी टाळण्यासाठी आजच पुढाकार घ्यावा आणि आपल्या मुलांचे शैक्षणिक भविष्य सुरक्षित करावे. दरम्यान, या आवाहनामुळे अनेक पालकांमध्ये जागरूकता निर्माण होत असून, प्रवेश प्रक्रियेत होणारी धावपळ टाळण्यासाठी ही सूचना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे वेळेत उपलब्ध असणे ही काळाची गरज बनली असून, पालकांनी याबाबत सजग राहणे आवश्यक आहे.

## नवीपेठेतील श्रीराम मंदिरात हनुमान जन्मोत्सवचा जल्लोष; भक्तांची अलोट गर्दी, महाप्रसादाने उत्सवाची सांगता



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने हनुमान जन्मोत्सव मोठ्या भक्तीभावाने, उत्साहात आणि दिमाखात साजरी करण्यात आली. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची अलोट गर्दी उसळली होती. हजारो भाविकांनी प्रभु श्रीराम व हनुमानजींच्या दर्शनाचा लाभ घेतला, तर असंख्य भक्तांनी प्रसादाचा लाभ घेत उत्सवात सहभागी होत आपली श्रद्धा व्यक्त केली.

हनुमान जन्मोत्सवानिमित्त पहाटे ४ वाजता जलाभिषेक, दुग्धाभिषेक व विशेष पूजनाने कार्यक्रमांची सुरुवात झाली. त्यानंतर प्रभु श्रीराम व हनुमानजींचा आकर्षक शृंगार करण्यात आला. सकाळी ६ वाजता हनुमान जन्म सोहळा व मंगल आरती मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी ''श्री राम जय राम जय जय राम'' या तारक मंत्राच्या गजराने मंदिर परिसर दुमदुमून गेला.

यानंतर सामूहिक हनुमान चालीसा पठण, रामनाम जप, भजन–कीर्तन व सत्संगाचे आयोजन करण्यात आले होते. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. दिवसभर अखंड नामस्मरण, हनुमान चालीसा पठण आणि भजनांच्या स्वरांनी वातावरण भक्तिमय झाले होते.
मंदिर परिसरात आकर्षक फुलांची सजावट व भव्य विद्युत रोषणाई करण्यात आल्याने उत्सवाला विशेष रंगत आली होती. दर्शनासाठी शिस्तबद्ध रांगा लावण्यात आल्याने भाविकांना सुरळीत दर्शन घेता आले. ट्रस्ट च्या सेवेकरी नी दिवसभर सेवा देत भाविकांना मार्गदर्शन केले.

हनुमान जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. घराघरांत हनुमान भक्तीचा प्रसार व्हावा या उद्देशाने हनुमान चालीसा पुस्तिकांचे मोफत वितरण करण्यात आले.

स्टेशन रोडवरील बडी साजन मंगल कार्यालय येथे दुपारी १२ ते २ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले . होते. या महाप्रसादाचा नगर शहरातील तीन–साडेतीन हजार भाविकांनी लाभ घेतला. शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचे वितरण करण्यात आले असून ट्रस्ट च्या सेवकरीनी मनापासून सेवा दिली.

दरम्यान, होळी पौर्णिमेपासून सुरू असलेल्या हनुमान चालीसा पठण, भजन संध्या व रामनामाच्या जागराचा समारोप हनुमान जन्मोत्सव या दिवशी रात्रौ ८ ते १०: ३० या वेळेत श्री बाळासाहेब बोराटे नगरसेवक माळीवाडा येथे मोठ्या धुम धडाक्यात अति उत्साहात करण्यात येणार आहे. संपूर्ण शहरात या कालावधीत भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते
संपूर्ण कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथ्था, उपाध्यक्ष निखिल शेटीया तसेच सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व सेवकरी नी अथक परिश्रम घेतले. हा हनुमान जन्मोत्सव भाविकांच्या स्मरणात राहणारा ठरला.

## तपोवन परिसरात अखंड हरिनाम सप्ताहा भक्तीमय वातावरणात पार

### चंद्रकांत महाराज खळेकर यांचे काल्याचे किर्तनाने सप्ताहाची सांगता

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** तपोवन परिसरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहा भक्तीमय वातावरणात पार पडला. गुरुवारी (दि.२ एप्रिल) सकाळी काल्याच्या किर्तनाने या सोहळ्याची सांगता झाली. या धार्मिक सोहळ्यात परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. महिला भाविकांची उपस्थिती लक्षणीय होती.
ह.भ.प. चंद्रकांत महाराज खळेकर यांचे काल्याचे किर्तन झाले. दरम्यान ह.भ.प. अभिमन्यू गिरी महाराज यांनी शबरी हिच्या जीवनातील करुणा आणि भक्ती यांचा अत्यंत हृदयस्पर्शी उहापोह केला. या धार्मिक सोहळ्याने आणि भक्तिमय वातावरणात संपूर्ण परिसर न्हाऊन निघाला.




२०२२ साली केवळ चार भाविकांच्या उपस्थितीत सुरू झालेला हा सप्ताह आज हजारो भाविकांच्या सहभागाने भव्य स्वरूपात पार पडला. कीर्तन व प्रवचनादरम्यान अभिमन्यू गिरी महाराजांनी शबरी आणि मातंग ऋषी यांच्या आश्रमातील प्रसंग अत्यंत प्रभावी शैलीत मांडला. त्यांनी सांगितले की, शबरी ही करुणामयी व दयाळू स्वभावाची होती. लग्नाच्या वेळी प्राण्यांची हत्या होणार असल्याचे पाहून तिने त्या हिंसेला विरोध केला आणि घर सोडून मातंग ऋषींच्या आश्रमात आश्रय घेतला.

महाराजांनी सांगितले की, शबरी ही लहानपणापासूनच दयाळू आणि करुणामयी स्वभावाची होती. तिच्या लग्नावेळी प्राण्यांची हत्या होणार असल्याचे पाहून तिने त्या हिंसेचा तीव्र विरोध केला आणि त्या प्रसंगातून पलायन केले. तिच्या या कृतीतून ''अहिंसा हाच खरा धर्ममार्ग'' आहे. हा संदेश मानव जातीला मिळतो.

प्रबोधनकार अभिमन्यू गिरी म्हणाले, शबरीने मातंग ऋषी यांच्या आश्रमात आश्रय घेतला आणि पूर्ण समर्पणाने गुरुसेवा केली. आश्रमातील प्रत्येक कार्य ती निष्ठेने पार पाडत असे. विशेष म्हणजे, आपल्या गुरूंच्या वचनावर विश्वास ठेवून तिने आयुष्यभर भगवान रामाच्या आगमनाची प्रतीक्षा केली.

शबरी रोज जंगलातील वाटा स्वच्छ करत असे, कारण तिला खात्री होती की एक दिवस राम त्या मार्गाने येतील. तिच्या या निखळ भक्तीमुळेच रामांनी तिच्या हातचे फळ प्रेमाने स्वीकारले, हा प्रसंग भक्तीचे सर्वोच्च उदाहरण मानला जातो.

## माळीवाडा येथील शनी मारुती मंदिरात विशेष महापुजा

### अहिल्यानगर शहरात विविध ठिकाणी 'बजरंग बली की जय' । घोषात हनुमान जयंती उत्सहात साजरी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** माळीवाडा येथील शनी–मारुती मंदिर येथे श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ठिक ६ वा. जन्मोत्सवाच्यावेळी श्री विशाल गणपती मंदिराचे महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते अभिषेक करुन महापुजा करण्यात आली. भजनी मंडळाच्या महिलांनी पाळणा हलवून हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी देवस्थानचे सचिव अशोकराव कानडे ,विश्वस्त विजय कोथिंबीरे,अनंत पांडे आदिंसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच मंदिर परिसर फुलांसह आकर्षक सजावट करण्यात आली होती.

शहरामध्ये विविध मंडळांनी हनुमान जयंतीनिमित्त विविध मंडळांनी आकर्षक अशा मुर्ती उभारुन जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच शहरातील विविध तालिमीमध्ये आकर्षक रोषणाई करुन



युवकांनी कावडीने आणलेल्या पाण्याने अभिषेक करण्यात आले. नगर शहरातील स्टेट बँक चौक, सर्जेपुरा, दिल्लीगेट, लक्ष्मी कारंजा, माळीवाडा, गणपतीची तालीम ,कोठीची तालीम ,नेप्तीगेट, झेंडीगेट, नेता सुभाष चौक, नालेगांव, वारुळाचा मारुती, नवग्रह मंदिर, भुतकरवाडी, श्रमिकनगर, पावन हनुमान मंदिर, बालिकाश्रम रोड, खाकीदास बाबा मठ, नित्यसेवा सोसायटी, मार्कंडेय सोसायटी गुलमोहोर रोड, तपोवन, भोसले आखाडा, अरणगांव रोड, रेल्वेस्टेशन, केडगांव, एकनाथनगर, भिंगार येथील रोकडेश्वर मंदिरावर आकर्षक सजावट करण्यात आली होती. भाविकांनी पहाटेपासूनच दर्शनासाठीसाठी रांगा लावल्या होत्या. रुईच्या पानांचा हार, मंदिराबाहेर नारळ, टरबुज–खरबुजाचा प्रसादाचे आयोजन करण्यात होते.

कौठीची तालिम, नानापाटील वस्ताद, वाडिया पार्क तालिम, गणपतीची तालिम, सातपुते तालिम, झारेकरगल्ली आदिं ठिकाणीची तालमींवर रोषणाई करुन सजावट करण्यात आली होती.

हनुमान जयंतीनिमित्त गेल्या अनेक दिवसांपासून अहिल्यानगर शहरात चौका–चौकात हनुमान चालिसा पाठाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ, मंगल भक्त सेवा मंडळ,श्री सकट मोचन हनुमान मंडळ आदि मंडळाने शहरात व उपनगरात हनुमान चालिसाचे पठण करुन भाविकांना मंत्रमुग्ध केले.

वरदवीर हनुमान सत्संग मंडळ यांचे वतीने माळीवाडा शनी–मारुती मंदिर येथे पहाटे हनुमान चालिसाचे आयोजन करण्यात आले होते

## राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत
## देवांश जाधव, आराध्या जाधव व श्रेया मरकड राज्याच्या गुणवत्ता यादीत चमकले

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** केडगाव येथील सरस्वती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने लक्ष्यवेध राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विविध इयत्तांमधील विद्यार्थ्यांनी राज्य आणि जिल्हा पातळीवर उज्वल कामगिरी करत शाळेचे नाव उंचावले आहे.

इयत्ता पहिलीतील देवांश महेश जाधव याने राज्यात सहावा क्रमांक पटकावला. इयत्ता दुसरीतील आराध्या सोमनाथ जाधव हिने राज्यात तिसरा क्रमांक मिळवला. त्याच इयत्तेतील श्रेया संजय मरकड हिने राज्यात अकरावा व जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळवला, तर कु. अंजली नवनाथ मळेकर हिने राज्यात पंधरावा व जिल्ह्यात आठवा क्रमांक पटकावला. इयत्ता तिसरीतील कु. लावण्या राजू बोरगे हिने राज्यात एकोणिसावा व जिल्ह्यात बारावा क्रमांक मिळवला. कु. स्वरा समीर कुलकर्णी हिने चौतीसावा व जिल्ह्यात चोवीसावा क्रमांक मिळवला.

इयत्ता चौथीतील कार्तिक अतुल सोनवणे याने राज्यात तिसावा व जिल्ह्यात तेवीसावा क्रमांक मिळवला, तर चि. श्लोक संजय मरकड याने राज्यात पंचेचाळीसावा व जिल्ह्यात अडोतीसावा क्रमांक मिळवला. इयत्ता पाचवीतील चि. आयुष बाबासाहेब पडळकर याने राज्यात तेहतीसावा व जिल्ह्यात सहवीसावा क्रमांक मिळवत गुणवत्ता यादीत स्थान मिळवले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक संदिप भोर, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद तसेच पालकांनी कौतुक केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सूर्य नगर तपोवन रोडवरील हनुमान मंदिर परिसर सुशोभीकरण शुभारंभ



महापौर ज्योती गाडे यांच्या हस्ते नारळ वाढवून शुभारंभ करण्यात आला.यावेळी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती व नगरसेविका सौ. वर्षा रोहन सानप, नगरसेविका सौ.रोशनी त्र्यंबके,बाळासाहेब पवार, निखिल वारे,महेश तवले,विशाल नाकाडे, रोहन ढवण, रोहन सानप कैलास गजे, बाबा घुले,शेखर धाडगे, ऋत्विक कथने,राजू भाऊ बोरूडे, बापू जाधव,तळेकर, किशोर पांगुळ,राजू नरोटे, तुषार गवळी,आदींसह परिसरातील नागरिक.

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ''हनुमान मंदिर हे परिसरातील श्रद्धास्थान असून या ठिकाणाचे सुशोभीकरण केल्याने नागरिकांना अधिक स्वच्छ व आकर्षक वातावरण मिळेल. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अशा कामांना आम्ही प्राधान्य देत आहोत. माजी खासदार डॉ.सुजय विखे यांच्या निधीतून व आमदार संग्राम जगताप यांच्या सहकार्याने मंदिर सुशोभीकरण करण्यात येत आहे. नागरिकांनीही परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे.'' असे प्रतिपादन महापौर ज्योती गाडे यांनी केले.

सूर्य नगर तपोवन रोडवरील हनुमान मंदिर परिसर सुशोभीकरण कामाचे महापौर ज्योती गाडे यांच्या हस्ते नारळ वाढवून शुभारंभ करण्यात आला.यावेळी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती व नगरसेविका सौ. वर्षा रोहन सानप, नगरसेविका सौ. रोशनी त्र्यंबके,बाळासाहेब पवार, निखिल वारे,महेश तवले,विशाल नाकाडे,रोहन ढवण,रोहन सानप कैलास गजे, बाबा घुले,शेखर धाडगे, ऋत्विक कथने,राजू भाऊ बोरूडे, बापू जाधव,तळेकर, किशोर पांगुळ,राजू नरोटे, तुषार गवळी,आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

सभापती तथा नगरसेविका वर्षा रोहन सानप म्हणाल्या ''सूर्य नगर परिसराच्या विकासासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. हनुमान मंदिर परिसराचे सुशोभीकरण हे नागरिकांच्या मागणीप्रमाणे करण्यात येत असून यामुळे परिसर अधिक सुबक आणि सुंदर होणार आहे. पुढील काळातही नागरिकांच्या गरजेनुसार विविध विकासकामे राबविण्याचा आमचा प्रयत्न राहील.''

## संस्थेतील शिस्तप्रिय, उत्तम प्रशासक प्राचार्य सेवानिवृत्त – छायाताई फिरोदिया

### शिस्तप्रिय, दूरदृष्टी असलेले प्राचार्य अजयकुमार बारगळ यांना निरोप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अ. ए. सो. चे रूपीबाई मोतीलालजी बोरा विद्यालयाचे प्राचार्य श्री अजयकुमार जगन्नाथ बारगळ यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित निरोप समारंभ वातावरणात संपन्न झाला. विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी, पालक व मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह सौ. छायाताई फिरोदिया होत्या. आपल्या अध्यक्षीय मनोगतात त्यांनी प्राचार्य बारगळ यांच्या शिस्तप्रिय, नियोजनबद्ध व विद्यार्थीकेंद्री कार्यशैलीचे विशेष कौतुक केले. ''संस्थेने दिलेली कोणतीही जबाबदारी बारगळ सरांनी अत्यंत यशस्वीरीत्या पूर्ण केली. विद्यार्थ्यांच्या हिताच्या योजना राबवून त्या पूर्णत्वास नेण्याची त्यांची जिद्द अनुकरणीय आहे,'' असे त्या म्हणाल्या.

शाळा समितीचे चेअरमन व संस्थेचे सल्लागार श्री भूषणजी भंडारी यांनीही बारगळ सरांच्या कार्यपद्धतीचा गौरव करताना त्यांच्या नेतृत्वगुणांचा विशेष उल्लेख केला. त्यांच्या कार्यकाळात सुरू करण्यात आलेल्या ई–रिझल्टशीट, ई–कॅटलॉग व ऑनलाईन कोचिंग क्लासेस या उपक्रमांचे संस्थेकडून विशेष कौतुक करण्यात आले.

समारंभाची सुरुवात घोष पथकाच्या तालावर एनसीसी विद्यार्थ्यांच्या मानवंदनेने झाली. एनसीसी विद्यार्थ्यांना श्री चौधरी विनायक यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेचे पर्यवेक्षक श्री विष्णू गिरी यांनी केले.
यावेळी प्राचार्य बारगळ यांच्या जीवनप्रवासावर आधारित हृदयस्पर्शी चित्रफीत प्रदर्शित करण्यात आली. ही चित्रफीत श्री रवींद्र पंडित यांनी तयार केली होती. चित्रफितीदरम्यान उपस्थित सर्वजण भावुक झाल्याचे पाहायला मिळाले.

कार्यक्रमाच्या व्यासपीठावर संस्थेच्या विश्वस्त सौ. सुनंदाताई भालेराव, ॲड. श्री गौरवजी मिरीकर, शाळा समिती सल्लागार सौ. सुनीताताई मुथा, श्री संजयजी बोरा, उपप्राचार्य श्री उत्तम बारगळ, प्रगतशील शेतकरी श्री संजय पानसरे, नगरसेविका सौ. अर्चनाताई पानसरे, भाऊसाहेब फिरोदिया विद्यालयाचे प्राचार्य श्री उल्हास दुगड, अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडीयम स्कूलचे प्राचार्य श्री प्रभाकर भाबड, नवीन मराठी शाळा विश्रामबागच्या मुख्याध्यापिका श्रीम. मीना पवार, सेनापती बापट विद्यालयाचे प्राचार्य श्री कासार, अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य श्री उबाळे, रुपीबाई बोरा न्यू इंग्लिश स्कूलचे उपप्राचार्य श्री रविकिरण भांड व पर्यवेक्षक श्री विष्णू गिरी यांची उपस्थिती होती.

# केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात माजी विद्यार्थिनींचा भावनिक मेळावा

## विद्यार्थिनी, शिक्षक आणि पालकांचा उत्स्फूर्त सहभाग



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात आयोजित करण्यात आलेला माजी विद्यार्थिनी मेळावा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. माजी विद्यार्थिनींची उपस्थिती लाभलेल्या या कार्यक्रमाने शाळेच्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी विद्यार्थिनींचे स्वागत करण्यात आले. सौ. छाया सुंबे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या मेळाव्यादरम्यान माजी विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतातून शाळेतील सुवर्णकाळातील आठवणींना उजाळा दिला. शिक्षकांविषयीचा आदर, शिस्तबद्ध शिक्षणपद्धती आणि जपलेले स्नेहबंध यांचे भावनिक शब्दांत वर्णन करण्यात आले. अनेकांच्या मनोगतातून शाळेने घडवलेले व्यक्तिमत्त्व आणि दिलेली मूल्ये अधोरेखित झाली.

यावेळी निवृत्त जेष्ठ शिक्षिका खिस्ती मॅडम व सौ. गरड मॅडम यांनीही आपल्या अनुभवसंपन्न आठवणी सांगत विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वासंती धुमाळ यांनी माजी विद्यार्थी संघाची आवश्यकता, उद्दिष्टे व भावी कार्ययोजना याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थिनींना संघटनात्मक कामात सक्रिय राहण्याचे आवाहन करत शाळेच्या प्रगतीत योगदान देण्यास प्रोत्साहित केले.

यानंतर माजी विद्यार्थी संघाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी सुषमा कदम, उपाध्यक्षपदी सौ. कोमल भांडे, सचिवपदी श्वेता भोर, कोषाध्यक्षपदी प्राप्ती ढोरकुले, खजिनदारपदी आफरीन सय्यद, सहखजिनदारपदी सिद्धी कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. तसेच श्री जालिंदर सातपुते यांची सल्लागार शिक्षक सदस्य म्हणून निवड झाली. थिटे नूतन यांचाही शिक्षक सदस्य म्हणून समावेश करण्यात आला.

पालक सदस्य म्हणून सौ. गरड सुरेखा विनायक, श्रीमती काकडे सुजाता, श्रीमती करांडे सुवर्णा,श्रीमती होंडे वृषाली,श्रीमती नाणेकर अनिता,श्रीमती खरात पल्लवी यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान निवृत्त जेष्ठ शिक्षक श्री. गारुडकर यांनी आपल्या भाषणातून माजी विद्यार्थिनींचे शाळेशी असलेले नाते अधिक दृढ करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. शाळेच्या सर्वांगीण विकासात माजी विद्यार्थी संघाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. एकूणच, हा मेळावा केवळ भेटीगाठींचा न राहता शाळेप्रती असलेल्या आत्मीयतेचा आणि एकतेचा सुंदर उत्सव ठरला. जालिंदर सातपुते यांनी आभार मानले.

नवकार महामंत्र दिन जनजागृतीसाठी जितोच्यावतीने रविवारी

# नवकार सायकल रॅली २०२६ चे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नवकार महामंत्र हा जगाच्या कल्याणासाठीचा मंत्र आहे. नित्यनेमाने नवकार जाप केल्यास अलौकिक ऊर्जा प्राप्त होते. भौतिक जगात अध्यात्मिक शांतता मिळते. याची प्रचीती जगभरात येत असल्याने ९ एप्रिल २०२६ रोजी जागतिक स्तरावर नवकार महामंत्र दिवस साजरा होत आहे.

यादिवशी अहिल्यानगर येथे आचार्यांश्रींच्या पावन भूमीतही नकार महामंत्र दिन साजरा होणार आहे. नवकार दिन जनजागृतीसाठी जितो अहिल्यानगर युथ विंगच्यावतीने रविवार दि. ५ एप्रिल २०२६ रोजी भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व समाजातील १२ वर्षांपुढील मुले मुली, महिला पुरुष यात सहभागी होऊन होवून विश्वशांती, इंधन बचत, उर्जा बचत, आरोग्याचा संदेश देणार आहेत, अशी माहिती जितो अहिल्यानगर युथ विंगचे चेअरमन चेतन भंडारी व सेक्रेटरी यश भंडारी यांनी दिली.

रविवारी सकाळी ७.३० वाजता आनंदधाम येथून सायकल रॅलीला सुरुवात होईल. आनंदधाम–मार्केट यार्ड–बंगाल चौकी– खिस्त गल्ली– कापड बाजार– दाळ मंडई – रामचंद्र खुंट– कोठी रोड ते आनंदधाम या रॅलीचा मार्ग असणार आहे. केशर गुलाब मंगल कार्यालय येथे रॅलीचा समारोप होईल. याठिकाणी सर्वांसाठी पौष्टिक नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली आहे.. सायकल रॅलीत सहभागी होणाऱ्या सर्वांना मेडल देण्यात येणार आहे.

नवकार मंत्र हा जगासाठी तारक मंत्र आहे. आताच्या जागतिक अशांततेच्या काळात तर अहिंसा व शांततेचे महत्व अधिक प्रकर्षाने जाणवत आहे. जगाला तारण्याची व शांतता प्रस्थापित करण्याची ताकद नवकार महामंत्रात आहे. नवकार जाप प्रत्येकाच्या मनात सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा असतो. त्यामुळेच जागतिक स्तरावर नवकार महामंत्र दिवस साजरा केला जातो. या दिव्य आयोजनाचा उद्देश नवकार महामंत्राच्या अद्भुत शक्तीचा प्रचार व प्रसार करणे आणि अधिकाधिक लोकांना या आध्यात्मिक साधनेसाठी प्रेरित करणे हा आहे. अहिल्यानगर शहरात आयोजित भव्य नवकार सायकल रॅलीत जास्तीत जास्त नगरकरांनी सहभागी होण्याचे आवाहन जितो अहिल्यानगरचे चेअरमन आलोक मुनोत व सेक्रेटरी तुषार कर्नावट यांनी केले आहे.

# सांस्कृतिक उपक्रमांमुळे व्यक्तिमत्त्व विकासाला चालना – प्राचार्य डॉ. रवींद्र नवथर

## डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात ''रिदम–२०२६'' सांस्कृतिक महोत्सव उत्साहात






**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे आयोजित करण्यात आलेला ''रिदम–२०२६'' हा सांस्कृतिक महोत्सव उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. महोत्सवाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. रवींद्र नवथर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीसोबतच सांस्कृतिक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. नवथर पुढे म्हणाले की, अशा प्रकारच्या सांस्कृतिक महोत्सवांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. आत्मविश्वास, संघभावना, सर्जनशीलता आणि नेतृत्वगुण विकसित होण्यासाठी हे व्यासपीठ अत्यंत उपयुक्त ठरते. शिक्षणासोबत कला आणि संस्कृतीचा समतोल साधल्यास विद्यार्थी सर्वांगीण प्रगती करू शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

महोत्सवाची सुरुवात ''ग्रुप डे / मिसमॅच डे'' या आकर्षक उपक्रमाने झाली. विद्यार्थ्यांनी एकसारख्या रंगातील तसेच वेगवेगळ्या मिसमॅच वेशभूषेत सहभाग घेत रंगत आणली. त्यानंतर साजऱ्या झालेल्या ''बॉलिवूड डे'' मध्ये विद्यार्थ्यांनी विविध बॉलिवूड पात्रांचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

तसेच ''हॅलोविन डे / ब्लॅक अँड व्हाइट डे / साडी व टाय डे'' या विविध थीम्समुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला. विद्यार्थ्यांनी कल्पक आणि सर्जनशील वेशभूषा सादर करत महोत्सवात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. महोत्सवाचा समारोप ''ट्रॅडिशनल डे'' ने झाला. पारंपरिक पोशाखात सजलेल्या विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे सुंदर दर्शन घडवले.

सर्व कार्यक्रम महाविद्यालय परिसरातील नासा पॉईट येथे पार पडले. स्नेहसंमेलन समन्वयक म्हणून प्रा. सुनील मांढरे यांनी काम पाहिले. शिक्षक समन्वयक म्हणून डॉ. सौ. के. डी. विधाते, प्रा. सौ. प्राची मोरे व प्रा. सौ. पूजा काजळे यांनी मोलाचे योगदान दिले. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून सिद्धार्थ हाके, स्नेहा आहिरे, राज देशमुख, रोहित फेगडे, पूजा बनसोडे, ओंकार जोशी, स्वेता सोनावणे व ओम रक्षे यांनी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

याशिवाय, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा. सुनील कल्हापुरे तसेच प्राचार्य डॉ.रवींद्र नवथर यांनी कार्यक्रमासाठी मार्गदर्शन केले. संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ. पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील तसेच चेअरमन व राज्याचे जलसंपदा तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

# बौद्ध संस्कार संघाच्या वतीने १४ एप्रिलला 'भीमपहाट'चे आयोजन

## बोरुडे, रुपवते व डॉ. वानखडे यांना 'भीमपहाट सन्मान' जाहीर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बौद्ध संस्कार संघाच्या वतीने मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ५ वाजता 'भीमपहाट' कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. चेतना लॉन्स, छ. संभाजीनगर रोड, अहिल्यानगर येथे होणाऱ्या या कार्यक्रमात भीमगीतांच्या सुरांनी परिसर भारावून जाणार असून, सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तींना 'भीमपहाट सन्मान पुरस्कार' देऊन गौरविण्यात येणार आहे.

या उपक्रमाबाबत माहिती देताना आयोजक भाऊसाहेब देठे यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर घडविणे, तसेच समाजातील प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्तींना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा 'भीमपहाट' कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे.

यावर्षी सामाजिक कार्यकर्ता जालिंदर बोरुडे, आनंद ऋषी हॉस्पिटलमध्ये कार्यरत असणाऱ्या मुख्य परिचारिका स्मिता मनोरंजन रुपवते, तसेच गुणे शास्त्री आयुर्वेदिक महाविद्यालयाचे सहाय्यक प्रा., कान ,नाक ,घसातज्ञ डॉ. तारकेश्वर सुखदेव वानखडे यांना 'भीमपहाट सन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती देठे यांनी दिली. त्यांच्या कार्याचा गौरव करून समाजात सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न या निमित्ताने करण्यात येणार आहे.

कार्यक्रमात सांस्कृतिक पर्वाचीही रेलचेल पाहायला मिळणार असून 'आर्केस्ट्रा संगीत सितारे' परिवाराच्या वतीने सादर होणाऱ्या भीमगीतांच्या मैफलीत गायक–निवेदक विनय कसबेकर यांच्यासह महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक नरेश बडेकर, अतुल थोरात, शाहीर वसंत डंबाळे, गायिका पल्लवी बोरुडे, तसेच गायिका अशा वडागळे आदी नामवंत कलाकार आपल्या सादरीकरणातून उपस्थितांना मंत्रमुग्ध करणार आहेत.

पहाटेच्या शांत, प्रसन्न वातावरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी भारलेली ही 'भीमपहाट' नागरिकांसाठी एक प्रेरणादायी पर्व ठरणार असून, मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन बौद्ध संस्कार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# काला म्हणजे भक्तीचा परिपूर्ण सोहळा, भगवंताच्या संगतीतच खरे सुख – ह.भ.प. प्रभाकर महाराज कावले

## नालेगावात अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता; प्रभाकर महाराज कावले यांच्या काल्याच्या कीर्तनाने रंगला सोहळा । हरिनाम, अभंग व संतविचारांनी वातावरण भारावले; महाप्रसादाने सांगता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नालेगाव येथील गाडगीळ पटांगण येथे श्री हनुमान जयंतीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय वातावरणात सांगता ह.भ.प. प्रभाकर महाराज कावले यांच्या काल्याच्या कीर्तनाने संपन्न झाली. सात दिवस चाललेल्या या धार्मिक सोहळ्यात हरिनाम, अभंग, कीर्तन व संतविचारांनी परिसर दुमदुमून गेला होता.
कीर्तन सेवेत ह.भ.प. प्रभाकर महाराज कावले यांनी ''तुझीये संगती झाली आमुची निश्चिंती'' या अभंगाच्या माध्यमातून भक्ती, ज्ञान आणि भगवंताच्या संगतीचे महत्त्व अधोरेखित केले. देव आणि गोपाळ यांच्यातील संवादातून त्यांनी भक्तीतील निश्चिंती, अज्ञानाचा नाश आणि पाप–पुण्याच्या बंधनातून मुक्त होणाऱ्या जीवनाचे तत्त्वज्ञान उलगडून सांगितले.

भगवंताच्या संगतीत मिळणारा निरपेक्ष आनंद हा सर्वश्रेष्ठ असून तोच खरा ''काला'' असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ''काला म्हणजे जीवनाची परिपूर्णता, भक्तीचा सोहळा आणि हरिनामाच्या माध्यमातून अनुभवता येणारा सर्वोच्च आनंद आहे,'' असे प्रतिपादन त्यांनी केले. मनुष्य देह हा या आनंदासाठीच लाभलेला असून भगवंताच्या संगतीतच खरे सुख प्राप्त होते, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून संतांचे विचार व कार्य समाजापर्यंत पोहोचते. अशा धार्मिक उपक्रमांमुळे समाज सुसंस्कृत होतो व आपल्या संस्कृतीचे जतन होते. नालेगाव येथे माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल यांच्या माध्यमातून गेल्या ३४ वर्षांपासून सुरू असलेली ही कीर्तन सेवा अत्यंत कौतुकास्पद असून त्यातून वारकरी परंपरा पुढील पिढीकडे पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होत आहे.

माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल यांनी सांगितले की, सात दिवस अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात पार पडला. सप्ताहाच्या सांगतेनिमित्त ह.भ.प. प्रभाकर महाराज कावले यांचे काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. यानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. टाळ–मृदंगाच्या गजरात, अभंग–कीर्तनाच्या सुरावटीत आणि हरिनामाच्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला.

(पान १ वरून)

### समतानगर ते नानाजी नगरपर्यंत चोरट्यांचा धुमाकूळ

सुरक्षिततेची भावना निर्माण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, या घटनांमुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले असून लवकरात लवकर कारवाई होऊन चोरट्यांना अटक व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### गोवंशाची कत्तल करणाऱ्या टोळीवर बीएनएस १११ चे कलम

हा टोळीचा म्होरक्या असून तो साथीदारांना एकत्र जमवून स्वतःच्या व टोळीच्या आर्थिक फायद्याकरिता गोवंशीय जनावरांची वाहतूक करणे, त्यांना चारापाणी न देणे, क्रूरतेने वागवणे, त्यांची कत्तल करणे, गोमांस ताब्यात बाळगून विक्री करणे या प्रकारचे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झालेले आहे. सदर आरोपींवर कॅम्प पोलीस ठाणे भिंगार येथे तीन गुन्हे दाखल असून, आरोपी हे संघटितपणे वारंवार अशा प्रकारचे गुन्हे करत असल्याने गु.र.नं. १६१/२०२६ या गुन्ह्यास भारतीय न्याय संहिता कलम १११ हे वाढीव कलम लावण्यात आले आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि जगदीश मुलगीर, पोहेकॉ दिलीप शिंदे व पोकॉ प्रमोद लहारे यांनी केली असून, पुढील तपास पोहेकॉ पांडुरंग बारगजे हे करत आहेत.

### युद्धामुळे शेअर बाजाराबरोबरच सोने–चांदीच्या दरात पडझड

गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीसाठी सोन्याचा आधार घेताना दिसत आहेत. दरम्यान महिनाभरापासून सोन्या चांदीच्या दरात घसरण पाहायला मिळतेय.
महिनाभरापूर्वी एक लाख ६१ हजार ८०० रुपयांवर असणाऱ्या सोन्याचा भाव मागच्या आठवड्यात १ लाख ४५ हजार रुपयांवर पोहोचला. काल (२ एप्रिल ) २४ कॅरेट सोन्याचा प्रति १० ग्रॅम दर १ लाख ५२ हजार ४९० रुपयांवर होता. चांदीचे दरही गेल्या महिन्याभरापासून घसरताना दिसत आहेत. महिनाभरापूर्वी २ लाख ६५,८८० रुपयांवर असणारी चांदी आठवड्याभरापूर्वी दोन लाख २७ हजार ९३० रुपयांवर पोहोचली होती. आज चांदीचा किलोमागे दर २ लाख ३२ हजार ९०० रुपये झाला आहे.

### अक्षय कर्डिले सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार

दिलीप भालसिंग उमेदवार अक्षय कर्डीले सुरसिंग पवार नामदेव ढोकणे आरपीआयचे सुरेंद्र थोरात काशिनाथ लवांडे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित साकळाई योजनेच्या कामाला १२३४कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा लाभक्षेत्रातील शेतकर्याच्या वतीने सत्कार करण्यात आला. आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील म्हणाले की,राहुरी मतदारसंघाच्या विकासासाठी स्व.शिवाजीराव कर्डीले यांची धडपड होती.त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने ही निवडणुक महत्वाची आहे.त्यामुळे एकमेकाबद्दल गावात हेवेदावे करण्यापेक्षा सकारात्मक दृष्टीकोन ठेवून आपल्याला निवडणुकीला सामोरे जायचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश सर्व क्षेत्रात प्रगती करीत आहे.जागतिक स्तरावर अस्थिरतेचे वातावरण आहे.कोव्हीड संकटानंतर आशा वातावरणात सुध्दा देश यशस्वीपणे वाटचाल करतो हे प्रधानमंत्र्यांच्या धोरणाचे यश आहे.परंतू इंधन आणि गॅसच्या टंचाईवरून सरकारला बदनाम करण्याच्या होणार्या प्रयत्नांना कार्यकर्त्यानी उतर देण्याचे मंत्री विखे पाटील यांनी सूचित केले. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्याची भूमिका महत्वाची ठरणार असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकार घेत असलेल्या निर्णय महत्वाचे आहेत.केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची माहीती प्रचाराच्या दरम्यान मतदारापर्यत घेवून जाण्याचे आवाहन त्यांनी केले. महायुती सरकारच्या माध्यमातून जिल्हयातील सिंचन प्रकल्पांसाठी मोठा निधी उपलब्ध होत आहे.वांबोरी चारी साकळाई योजनेचे स्व.शिवाजीराव कर्डीले यांचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने झालेले निर्णय महत्वाचे आहेत.वर्षानुवर्ष दुष्काळ पाहीलेल्या भागाला पाणी देण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यामातून होत आहे.भविष्यात राहुरी तालुक्यातील औद्योगिक विकासासाठी काम करून रोजगार निर्मिती करण्याच्या दृष्टीने होणारी निवडणूकीला सकारात्मकतेने सामोरे जाण्याचे आवाहन मंत्री विखे पाटील केले. आ.मोनिका राजळे यांनी आपल्या भाषणात स्व.कर्डीले यांच्या कार्याला उजाळा देवून प्रत्येकाने स्वता अक्षय कर्डीले समजून निवडणुकीला सामोरे जाण्याचे आवाहन केले.तालुक्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांसाठी साकळाई योजनेचा झालेला निर्णय निवडणुकीसाठी शुभसंकेत असल्याचे सागितले.सुभाष पाटील दिलीप भालसिंग अक्षय कर्डीले यांची भाषण झाली. कॉग्रेस पक्षाने राहुरी विधनासभा निवडणुक लढविण्याच्या घेतलेल्या निर्णयावर माध्यमांशी बोलतांना मंत्री विखे पाटील म्हणाले की महायुतीचा विजय निश्चित आहे.थोरातांनी राहुरीपेक्षा संगमनेरची निवडणुक गांभिर्याने घ्यायला हवी होती. अशोक खरात यांच्या प्रकरणाबाबत थोरातांनी केलेल्या वक्तव्याचा समाचार घेताना या प्रकरणाचे पाळमुळे शिर्डीत की संगमनेर मध्ये हे चौकशी समितीतून समजेल असे सुचक वक्तव्य मंत्री विखेंनी केले.

### गारपिटीसह अवकाळी पावसाने नुकसानीची आ. दातेंनी केली पाहणी

कठीण परिस्थितीत एकटे सोडले जाणार नाही.''
या पाहणी दौऱ्यात जिल्हा कृषी अधिकक्ष सुधाकर बोराळे, ग्राम महसूल अधिकारी श्रीम. बोटे के. डी., कृषी सहाय्यक गायकवाड, ग्रामविकास अधिकारी आहेर, कृषी अधिकारी कुणाल खोमणे यांच्यासह वसंत थोरात, डॉ. उत्तम थोरात, योगेश थोरात, संग्राम पावडे, रामदास थोरात, भाऊसाहेब डेरे, अशोक डेरे, लक्ष्मण डेरे, खंडू दादा थोरात, खंडू जरारे, बबनराव थोरात साहेब, संजीव येवले सर, दत्तात्रय खामकर, कैलास थोरात, दौलत डेरे, प्रज्योत थोरात, भावेश येवले, स्वराज थोरात, बाबाजी जरारे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.
जमिनीवर पडलेली पिके आणि उद्ध्वस्त झालेला शेतमाल पाहून ग्रामस्थांनीही आपली व्यथा आमदार दाते सरांच्यासमोर मांडली. अनेक ठिकाणी काढणी ठप्प झाल्यामुळे शेतमाल विक्रीसाठी अडचणी निर्माण झाल्या आहेत. या परिस्थितीत शासनाने तातडीने मदतीचा हात द्यावा, अशी मागणी उपस्थित शेतकऱ्यांकडून करण्यात आली.